पुण्य नगरी

# रवळनाथचे कार्य कौतुकास्पद : मुख्याधिकारी सुर्वे

**आजरा : प्रतिनिधी**

प्रतिकूल परिस्थिती व दुर्गम भागात काम करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यासह त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि., आजरा (मल्टिस्टेट) करत आहे. संस्थेचे हे कार्य कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार आजरा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी सूरज सुर्वे यांनी काढले.

श्री रवळनाथ हौसिंग फायनान्सच्या आजरा येथील शाखा कार्यालयात आयोजित सत्कार समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.



**आजरा : सुरेखा नाईक यांचा सत्कार करताना सूरज सुर्वे. उपस्थित एम. एल. चौगुले यांच्यासह अन्य.**

अध्यक्षस्थानी रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते.

यावेळी जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षिका पुरस्कारप्राप्त सुरेखा नाईक यांचा सत्कार करण्यात आला. सुर्वे पुढे म्हणाले, जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकांमुळेच आज अनेक जण उच्च पदावर कार्यरत आहेत. रवळनाथचे मानद ब्रॅण्ड ॲम्बेसिडर डॉ. ज्ञानेश्वर मुळे हेदेखील ग्रामीण भागातूनच घडलेले आहेत.

चौगुले म्हणाले, नोकरदारांच्या गरजेतून निर्माण झालेल्या रवळनाथने स्थापनेपासूनच सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. पारदर्शक कारभार, निःस्वार्थी संचालक, सल्लागार आणि प्रामाणिक कर्मचाऱ्यांमुळेच अल्पावधीत संस्थेची चौफेर प्रगती झाली आहे. अध्यक्ष प्रा. डॉ. विनायक आजगेकर यांनी स्वागत केले.

कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. वासुदेव मायदेव, संचालक प्रा. डॉ. दत्तात्रय पाटील, सीईओ दत्तात्रय मायदेव, प्रा. डॉ. शिवशंकर उपासे, प्रा. डॉ. नवनाथ शिंदे, प्रा. राजीव टोपल, सुभाष नाईक, शाखाधिकारी बसवराज चौगुले आदी उपस्थित होते.

Smart Kolhapur Edition
Sep 9, 2023 Page No. 03
Powered by : eReleGo.com